# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, जळगांव ४२५ ००२.

✆ ०२५७-२२८१५२२ (कार्या.) २२८१३१९ (फॅक्स)

Web : www.gcoej.ac.in Email : princoej@rediffmail.com


जा क्र शाअमज /लेखा/ २०२४/ 207 दिनांक- 2 FEB 2024

परिपत्रक -

**विषय - प्राप्तीकराचे विवरणपत्र भरून सादर करणेबाबत....**

संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचा-यांना कळविण्यात येते की, माहे फेब्रुवारी - २०२४ च्या वेतन देयकासोबत प्राप्तीकराचे विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे.

त्यामुळे ज्या अधिकारी / कर्मचा-यांचे वार्षिक उत्पन्न रु २,५०,०००/- व त्यापेक्षा अधिक आहे अशा सर्वांनी सन २०२३-२०२४ चे विवरणपत्र व रिटर्न भरणे बंधनकारक असून **ती प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे.**

सन २०२३-२०२४ या वर्षासाठी आवश्यक असलेला विवरणपत्राचा नमुना संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यांत आलेला आहे. सन २०२३-२४ या वित्तिय वर्षामधील वेतनाचे विवरणपत्र सर्व अधिकारी व कर्मचा-यांचे वैयक्तिक सेवार्थ लॉगीन मध्ये Employee Pay Drawn Report मध्ये उपलब्ध आहे. वेतनाशिवाय इतर अतिरिक्त मानधन व इतर सर्व मार्गाने प्राप्त होणारे उत्पन्न दर्शविण्याची जबाबदारी संबंधितांची राहील. संबंधितांनी त्यांचे आयकर विवरणपत्रात दर्शविलेल्या प्रत्येक बचतीच्या कागदपत्रांचा (१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ पर्यंत केलेल्या) छायांकीत संच दोन प्रतीत (Self Attested) विवरणपत्रासोबत जोडावा. अपेक्षित बचत दाखविल्यास विहित नमुन्यातील हमीपत्र संचासोबत सादर करावे व सदर रक्कम भरल्यानंतर त्याची प्रत ताबडतोब न चुकता कार्यालयास सादर करावी.

सर्व विभागप्रमुखांनी सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दयावे व त्यातील सूचनांनुसार कार्यवाही करून सर्वांचे आयकर विवरणपत्र दोन प्रतीत कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५.२.२०२४ पर्यंत कार्यालयात सादर करावे. ज्या अधिकारी / कर्मचारी वर्ग यांना आयकर विवरणपत्राची तपासणी करून घेण्याची आवश्यकता असेल त्यांनी प्रबंधक/कार्यालय अधिक्षक यांचे कडून तपासून घ्यावे. जेणेकरून देय आयकर फेब्रुवारी-२०२४ या महिन्यात कपात करून वेतनदेयके वेळेवर सादर करता येतील.

वेतनदेयके सद्यस्थितीत ऑनलाईन तयार होत असल्यामुळे व ते तयार करण्याची कालमर्यादा असल्यामुळे दिनांक १५.२.२०२४ नंतर, ज्या अधिकारी / कर्मचा-यांचे विवरणपत्र प्राप्त होईल, त्यांचे माहे फेब्रुवारीचे २०२४ चे वेतन हे नियमित वेतन देयकासोबत काढता येणार नाही तसेच त्यांचे त्यानंतरचे देखील वेतन काढता येणार नाही, यासंदर्भात होणा-या परिणामास संबधित जबाबदार राहतील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

02/02/2024

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगांव

प्रत - १.सर्व विभागप्रमुखांना माहीती व पुढील कार्यवाहीस्तव

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून दयावे व कर्मचा-यांची स्वाक्षरी केलेली प्रत कार्यालयात जमा करावी.

२. प्रबंधक/कार्यालय अधिक्षक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आयकर विवरणपत्र व्यवस्थित तपासून घ्यावेत.

F:\Rajput\Lockdown\RAJPUT Engg updated\Circular.docx